पाच आजारांत एकच जैविक प्रक्रिया!

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : पोस्ट-ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर (पीटीएसडी), लाँग कोविड, रूमेटॉइड आर्थरायटिस, क्रॉनिक फॅटिग सिंड्रोम आणि मल्टिपल स्क्लेरोसिस या पाच वेगवेगळ्या आजारांत आढळणाऱ्या थकव्यामागे एकच समान जैविक प्रक्रिया कारणीभूत असल्याचे समोर आले आहे. 'जर्नल ऑफ ट्रान्सलेशनल मेडिसिन'मध्ये प्रसिद्ध झालेल्या या संशोधनानुसार, विषाणूजन्य संसर्ग, मानसिक आघात किंवा ऑटोइम्यून प्रतिक्रिया यांसारख्या वेगवेगळ्या कारणांमुळे उद्भवणाऱ्या या आजारांमध्ये जैविक साम्य आढळून आले आहे.

यूकेमधील ईस्ट अँग्लिया विद्यापीठ आणि ऑक्सफर्ड बायोडायनामिक्सच्या संशोधकांनी केलेल्या या अभ्यासात असे दिसून आले की, प्रत्येक आजाराशी संबंधित जनुके शरीरातील प्रमुख जैविक प्रणालींना एकाच मार्गाने प्रभावित करतात. यामध्ये रोगप्रतिकारशक्ती, दाहक सिग्नलिंग, ऊर्जानिर्मिती, चयापचय नियंत्रण, ताण-प्रतिसाद यंत्रणा आणि न्यूरोएंडोक्राइन सिग्नलिंग यांचा समावेश आहे. लाँग कोविड किंवा मानसिक आघाताचा सामना केलेल्या रुग्णांमध्ये समान लक्षणे का दिसतात, याचे स्पष्टीकरण या शोधामुळे मिळाले आहे. वेगवेगळ्या कारणांमुळे हे आजार सुरू होत असले, तरी ते शरीरातील ऊर्जानिर्मिती व रोगप्रतिकार यंत्रणा नियंत्रित करणाऱ्या एकाच जैविक नेटवर्कवर परिणाम करतात. त्यामुळे रुग्णाला दीर्घकालीन थकव्याचा सामना करावा लागतो.



प्रादेशिक भाषांबाबत 'यूपीएससी'ची असमर्थता

'सीसॅट' प्रश्नपत्रिका मराठीत उपलब्ध करून देण्याची मागणी फेटाळली

अनिकेत साठे, लोकसत्ता

नाशिक : देशातील उच्चपदस्थ सनदी अधिकाऱ्यांच्या निवडीसाठी घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा पूर्वपरीक्षेत सर्व प्रादेशिक भाषांमध्ये प्रश्नपत्रिका उपलब्ध करून देण्यास केंद्रीय लोकसेवा आयोगाने (यूपीएससी) असमर्थता दर्शविली आहे.

'यूपीएससी'च्या महत्त्वाच्या नागरी सेवा पूर्व परीक्षेतील 'सामान्य अध्ययन पेपर-१' आणि 'सामान्य अध्ययन पेपर-२' (सीसॅट) या दोन्ही प्रश्नपत्रिका मराठीसह संविधानाच्या आठव्या अनुसूचीतील सर्व भारतीय भाषांमध्ये उपलब्ध करून द्याव्यात, यासाठी महाराष्ट्रातील विद्यार्थी पाठपुरावा करीत आहेत. या संदर्भातील निवेदनाला 'यूपीएससी'ने दिलेल्या उत्तरामुळे त्यांचा भ्रमनिरास झाला.

बहुभाषिक देशात राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धात्मक परीक्षेत सर्व भाषिक विद्यार्थ्यांना समान आणि न्याय्य संधी मिळणे आवश्यक आहे. आयोगाची नागरी सेवा परीक्षा ही देशातील सर्वोच्च आणि अत्यंत महत्त्वाची स्पर्धात्मक परीक्षा आहे. या माध्यमातून भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा तसेच इतर केंद्रीय सेवांसाठी उमेदवारांची निवड केली जाते. त्यामुळे या परीक्षेची प्रक्रिया देशातील विविध भाषिक आणि सामाजिक पार्श्वभूमीच्या विद्यार्थ्यांसाठी शक्य तितकी समावेशक असणे आवश्यक आहे, याकडे विद्यार्थ्यांनी निवेदनातून लक्ष वेधले होते.

सामान्य अध्ययन पेपर-१ आणि सामान्य अध्ययन पेपर-२ या दोन्ही प्रश्नपत्रिका हिंदी आणि इंग्रजी या दोन भाषांत तयार केल्या जातात. त्यामुळे मराठीसह अन्य प्रादेशिक भाषांमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना भाषिक अडचणी भेडसावतात. त्यामुळे भाषेची अडचण केवळ ती समजण्यापुरती मर्यादित नसून तिचा थेट परिणाम वेळेच्या व्यवस्थापनावर आणि अंतिम गुणांवर होऊ शकतो, याकडेही विद्यार्थ्यांनी लक्ष वेधले.

भाषिक अडचणींवर विद्यार्थ्यांचे बोट

१) प्रश्नपत्रिकेची भाषा विद्यार्थ्यांच्या वास्तविक क्षमतेच्या मूल्यमापनात अडथळा ठरू नये, अशी विद्यार्थ्यांची अपेक्षा आहे. यातील एक पेपर इतिहास, भूगोल, भारतीय राज्यव्यवस्था, अर्थव्यवस्था, पर्यावरण, विज्ञान-तंत्रज्ञान, चालू घडामोडी आदी विषयांवर आधारित आहे.

२) प्रादेशिक भाषेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या विषयांचे ज्ञान असूनही प्रश्नांचा नेमका आशय लक्षात घेण्यास वेळ लागू शकतो. तांत्रिक शब्दावली समजून घेण्यासाठी अतिरिक्त मानसिक प्रक्रिया करावी लागते. पर्यायांमधील सूक्ष्म फरक आणि प्रश्नातील अपवाद लक्षात घेण्यास अडचणी येतात.

३) भाषिक अडथळ्यांमुळे गुणांवर परिणाम होण्याची शक्यता बळावते. दुसऱ्या पेपरमध्ये मोठे उतारे वाचून प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतात. इंग्रजीतून शिक्षण न घेतलेल्या विद्यार्थ्याला त्यांचा अर्थ समजून घेणे, मुख्य मुद्दा ओळखणे, लेखकाचा दृष्टिकोन आणि निष्कर्ष समजून घेण्यासाठी तुलनेने अधिक वेळ लागू शकतो.

नागरी सेवा परीक्षेत प्रादेशिक भाषेतील उमेदवारांसाठी पुरेशा तरतुदी उपलब्ध असल्याचे 'यूपीएससी'ने म्हटले आहे. उमेदवारांना अर्हता भाषा पेपर (भारतीय भाषा आणि इंग्रजी) वगळता सर्व प्रश्नपत्रिकांची उत्तरे भारतीय राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट असलेल्या कोणत्याही एका भाषेत किंवा इंग्रजीत देण्याचा पर्याय आहे.

आयोगाचे उत्तर काय?

- सर्व भाषांमध्ये प्रश्नपत्रिकांची छपाई करण्यासाठी मोठ्या संख्येने तज्ज्ञांचा सहभाग घ्यावा लागेल. त्यामुळे प्रश्नपत्रिकेच्या निर्मिती प्रक्रियेतील सचोटीवर परिणाम होऊ शकतो.
- या कामात कमीतकमी तज्ज्ञांची नियुक्ती करणे अत्यावश्यक आहे, असे उत्तर 'यूपीएससी'ने मराठी भाषेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दिले आहे.
- प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी किमान संख्येने तज्ज्ञांची नियुक्ती करणे अत्यावश्यक आहे.
- प्रादेशिक भाषेशी संबंधित एक प्रकरण मद्रास उच्च न्यायालयात प्रविष्ट असल्याचे 'यूपीएससी'च्या परीक्षा विभागाचे अवर सचिव जितेंद्रकुमार मंडल यांनी उत्तरात म्हटले आहे.

Jai Durga Bahu-uddheshiya Jankalyan Sanstha's

ORANGE CITY INSTITUTE OF MANAGEMENT

NAAC ACCRIDITED, DTE CODE - 4125
(Formerly known as Green Heaven Institute of Management and Research)
Approved by AICTE, New Delhi, DTE, Mumbai, Govt. of Maharashtra
Affiliated by Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University

ADMISSION NOTIFICATION 2026-27

FOR VACANCY (if any) Under CAP / Institute
1st YEAR M.C.A. & M.B.A.

Applications are invited for probable vacancies against Cancellation / Non reporting of CAP Seats / Cancellation of Institute Quota seats.

S.N.	EVENTS	1st year M.C.A.	1st year M.B.A.
1	Availability of Admission Form (AF)	5th Sep. 2026 & 12th Sep. 2026	8th Sep. 2026 & 12th Sep. 2026
2	Submission of Duly Filled AF along with attested copies of required documents & DD/ Cash Receipt of Payment (Rs.1000/- non refundable) *As per Vacancy Position	5th Sep. 2026 & 12th Sep. 2026	8th Sep. 2026 & 12th Sep. 2026
3	Display of vacant seats on College Notice Board & institute website	6th Sep. 2026	9th Sep. 2026
4	Grievances, if any	10th Sep. 2026	11th Sep. 2026
5	Display Merit List on college website and Institute Notice Board (As per the Submitted of Admission Form & Documents)	11th Sep. 2026	12th Sep. 2026
6	Complete Admission Process by following Government Admission Rules (As per Rule 13 of Information Brochure AY 2026 27)	13th Sep 2026 to 15th Sep. 2026	13th Sep 2026 to 15th Sep. 2026

Courses Available :- M.C.A & M.B.A

Note: 1) All admission will be based on order of preference & guidelines as per admission Brochure published by DTE, Mumbai for respective courses. 2) Merit List of M.C.A & M.B.A. shall be displayed on college Website and also on college Notice Board. 3) For Details, refer college website www.ssitngp.com. 4) For this Vacancy round of M.C.A & M.B.A. the students already admitted in OCIM either through the CAP or Institute Level quota are not eligible. 5) Admission will be done strictly on the basis of merit.
Contact details : M.C.A & M.B.A :- 08218520953

PRINCIPAL

SBI

माहिती संरक्षण विभाग, भारतीय स्टेट बँक, ग्लोबल आयटी– सेंटर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई – ४००६१४

प्रस्तावाची विनंती (आरएफपी)

संदर्भ: SBI/GITC/SECURITY OPERATIONS CENTRE/२०२६/२०२७/१४८८

दिनांकित: 04.09.2026

भारतीय स्टेट बँक (एसबीआय) ने एसओसी साधने आणि सेवांसाठी वार्षिक देखभाल करारासाठी प्रस्तावासाठी विनंती (आरएफपी) सूचना जारी केली आहे. अधिक तपशीलांसाठी, कृपया **https://sbi.bank.in** येथील 'प्रोक्युरमेंट न्यूज' आणि ई-निविदा पोर्टल (**https://etender.sbi/SBI**) ला भेट द्या. आरएफपी सूचनेमध्ये नमूद केलेल्या निकषांवर आधारित पात्र निविदाकार, निविदा शुल्क भरून दिनांक 04.09.2026 ते 21.09.2026 रोजी दुपारी 03:00 वाजेपर्यंत संपूर्ण आरएफपी प्राप्त करू शकतात.
पात्र निविदाकारांद्वारे निविदा सादर करण्याची अंतिम तिथी आणि वेळ: 25.09.2026, संध्याकाळी 05:00 वाजता.

स्थळ: नवी मुंबई
दिनांक: 04.09.2026

उप महाव्यवस्थापक (एसओसी)
माहिती संरक्षण विभाग

Maharashtra Airport Development Company Ltd.

MADC

CIN: U45203MH2002SGC136979

TENDER NOTICE – 2nd CALL

MADC invites Bids for "Operating Staff Canteen at the designated area outside Terminal Building (City Side) of Shirdi International Airport. – 2nd Call"

The detailed tender document can be downloaded from the website **www.mahatenders.gov.in** from **04/09/2026**, 04:00 PM

Sd/-
Vice Chairman & Managing Director, MADC

नमुना क्र. युआरसी-२

अधिनियमाच्या प्रकरण XXI च्या भाग I अंतर्गत नोंदणीबाबत नोटीस देणारी जाहिरात
कंपनी कायदा, 2013 च्या कलम 374(बी) आणि कंपनी (नोंदणीकृत होण्यास अधिकृत) नियम, 2014 च्या नियम 4(1) ला अनुसरून

1. याद्वारे नोटीस देण्यात येते की, कंपनी कायदा, 2013 च्या कलम 366 च्या उप-कलम (2) ला अनुसरून, **''माधव गंधे फाउंडेशन''** या ट्रस्टची कंपनी कायदा, 2013 च्या प्रकरण XXI च्या भाग I अंतर्गत 'गॅरंटीद्वारे मर्यादित कंपनी' (Company limited by guarantee) म्हणून नोंदणी करण्यासाठी, या तारखेपासून पंधरा दिवसांनंतर परंतु तीस दिवसांची मुदत संपण्यापूर्वी रजिस्टर, न्यू सेक्रेटरीएट बिल्डिंग, दुसरा माळा, ईस्ट विंग, सिव्हिल लाइन्स, नागपूर – 440001, महाराष्ट्र यांच्याकडे अर्ज करण्याचा प्रस्ताव आहे.
2. कंपनीची मुख्य उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत:
   i. कंपनी कायदा, 2013 च्या भाग 1 – प्रकरण XXI च्या कलम 366 ते 374 सह वाचल्या जाणाऱ्या कंपनी (नोंदणीकृत होण्यास अधिकृत) नियम, 2014 (वेळोवेळी सुधारित) अंतर्गत नोंदणी क्रमांक F-34617 (दिनांक 03.10.2016) असलेला हयात असलेला **''माधव गंधे फाउंडेशन''** हा ट्रस्ट, कंपनी कायदा, 2013 अंतर्गत 'शेअर भांडवल नसलेली आणि गॅरंटीद्वारे मर्यादित' अशी **''माधव गंधे फाउंडेशन''** (कलम 8 ची कंपनी / Section 8 Company) म्हणून समाविष्ट/रूपांतरित करणे.
   ii. शाळा, महाविद्यालये, व्यावसायिक व शैक्षणिक संस्था, ग्रंथालये, वसतिगृहे आणि कला, विज्ञान, वाणिज्य, व्यवस्थापन, अभियांत्रिकी, वैद्यकीय, नर्सिंग, फार्मसी, कृषी, कायदा, संगणक शिक्षण, शारीरिक शिक्षण आणि इतर व्यावसायिक किंवा तांत्रिक अभ्यासक्रमांचे केंद्र स्थापन करणे, चालवणे, व्यवस्थापन करणे व त्यांना पाठबळ देणे; तसेच गरजू, आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकांतील व्यक्तींना शिष्यवृत्ती, विद्यावेतन, शैक्षणिक मदत व प्रशिक्षण देणे.
   iii. जात, धर्म, वर्ण, पंथ, भाषा किंवा लिंग या आधारावर भेदभाव न करता मुले, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक, आदिवासी आणि ग्रामीण समुदाय, दिव्यांग व्यक्ती व समाजातील इतर वंचित घटकांसाठी कल्याणकारी उपक्रम हाती घेणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे; ज्यामध्ये प्रौढ शिक्षण, कुटुंब कल्याण, कौशल्य विकास, रोजगाराभिमुख प्रशिक्षण, अनाथालये, वृद्धाश्रमे, बालसंगोपन केंद्र व वसतिगृहे यांचा समावेश आहे.
   iv. रुग्णालये, दवाखाने, वैद्यकीय व फिजिओथेरपी सेंटर्स, ब्लड बँक्स, आय बँक्स आणि आरोग्य सेवा संस्था स्थापन करणे, चालवणे किंवा त्यांना मदत करणे; तसेच आजारपण, महासाथीचे रोग, पूर, दुष्काळ, भूकंप, नैसर्गिक आपत्ती आणि इतर आपत्कालीन परिस्थितीदरम्यान गरीब व गरजू व्यक्तींना वैद्यकीय मदत पुरवणे आणि मोठ्या वैद्यकीय उपचारांसाठी मदत करणे.
   v. क्रीडा, शारीरिक शिक्षण, भारतीय कला, साहित्य, संगीत, नृत्य, नाटक, लोककला व आदिवासी कला, पारंपारिक आणि सांस्कृतिक वारसा यांना प्रोत्साहन देणे, त्यांचा विकास करणे व संरक्षण करणे; तसेच प्रशिक्षण केंद्रे, आर्ट गॅलरी, सांस्कृतिक संस्था स्थापन करणे आणि क्रीडा, कला व सांस्कृतिक एकात्मतेला चालना देण्यासाठी स्पर्धा, स्पर्धा परीक्षा, प्रदर्शने, महोत्सव, परिसंवाद, शिष्यवृत्ती, सांस्कृतिक कार्यक्रम आणि राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांचे आयोजन करणे.
   vi. पर्यावरण संरक्षण, प्रदूषण नियंत्रण, वने व वन्यजीव संरक्षण, स्वच्छता, आरोग्य, सार्वजनिक उपयुक्तता सेवा आणि राष्ट्रीय वारसा, स्मारके व पारंपारिक सांस्कृतिक वारशाचे जतन यांच्याशी संबंधित कार्यक्रम व प्रकल्प हाती घेणे, चालवणे व अंमलबजावणी करणे (केंद्र, राज्य किंवा स्थानिक सरकार आणि इतर कायदेशीर संस्थांच्या योग्य योजनांची अंमलबजावणी करण्यासह).
   vii. लोकांमध्ये एकता, अखंडता, बंधुभाव, जातीय सलोखा, सामाजिक व सांस्कृतिक एकात्मता आणि सौहार्दपूर्ण संबंधांना चालना देणे; तसेच समाजाच्या प्रगतीसाठी शैक्षणिक, बौद्धिक, नैतिक, सामाजिक, मनोरंजनात्मक आणि सामुदायिक कार्यक्रम, व्याख्याने, चर्चासत्रे, परिषद, वादविवाद, शिबिरे व इतर उपक्रमांचे आयोजन करणे.
   viii. केंद्र व राज्य सरकारे, स्थानिक स्वराज्य संस्था, विद्यापीठे, बिगर-शासकीय संस्था (NGOs), खाजगी संस्था, आंतरराष्ट्रीय एजन्सी आणि इतर कायदेशीर संस्थांच्या सहकार्याने शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरणीय, क्रीडा, ग्रामीण विकास आणि कल्याणकारी प्रकल्प हाती घेणे, तयार करणे, अंमलात आणणे व सुलभ करणे; तसेच शैक्षणिक व आंतरराष्ट्रीय शैक्षणिक देवाणघेवाण कार्यक्रमांना प्रोत्साहन देणे आणि सार्वजनिक हितासाठी प्रकल्प सल्लागार, सादरीकरणे व नाविन्यपूर्ण उपाय प्रदान करणे.
   ix. पुस्तके, जर्नल्स (नियतकालिके), मासिके, पुस्तिका आणि इतर शैक्षणिक किंवा माहितीपूर्ण साहित्य प्रकाशित करणे किंवा त्यांच्या प्रकाशनास मदत करणे; कायदेशीर अनुदाने, देणग्या, अंशदान आणि कॉर्पस फंड स्वीकारणे आणि त्यांचा वापर केवळ कंपनीच्या उद्दिष्टांसाठी करणे; नैसर्गिक आपत्ती आणि आपत्कालीन परिस्थितीत मदत पुरवणे; आणि सदस्यांना कोणताही नफा किंवा उत्पन्न न वाटता, वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अनुषंगिक किंवा पोषक असलेल्या सर्व कायदेशीर धर्मादाय उपक्रम हाती घेणे.
3. प्रस्तावित कंपनीच्या मसुदा 'मेमोरँडम आणि आर्टिकल्स ऑफ असोसिएशन' ची प्रत सी/ओ, मोहन गंधे, प्लॉट नं. 88, लेंड्रा पार्क, रामदासपेठ, नागपूर - 440010, महाराष्ट्र, भारत येथील कार्यालयात पाहता येईल.
4. याद्वारे नोटीस देण्यात येते की, या अर्जावर हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने आपली हरकत या नोटीसच्या प्रकाशनाच्या तारखेपासून एकवीस (21) दिवसांच्या आत' रजिस्ट्रार, सेंट्रल रजिस्ट्रेशन सेंटर (CRC), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स (IICA), प्लॉट नं. 6,7,8, सेक्टर 5, IMT मानसर, जिल्हा गुडगाव (हरियाणा), पिन कोड-122050' यांच्याकडे लेखी स्वरूपात कळवावी आणि त्याची एक प्रत कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात पाठवावी.

दिनांक ०३, सितम्बर, २०२६

अर्जदारांची नावे:
1. मोहन माधव गंधे
2. अमित सुरेंद्र येनूरकर
3. गौरव इंद्रचंद जयपुरिया
4. अपर्णा मोहन गंधे
5. वीणा गौरव जयपुरिया
6. अरविंद परमानंद खरे
7. मुकुंद विष्णू देशपांडे

KASTURI METAL COMPOSITE LIMITED

कस्तुरी मेटल कम्पोझिट लिमिटेड

21 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

सूचना याद्वारे देण्यात येत आहे की, कंपनीच्या सदस्यांची **21 वी वार्षिक सर्वसाधारण सभा ("एजीएम")** ही, कंपनी कायदा, 2013 आणि त्याअंतर्गत बनवलेले नियम, तसेच कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय ("एमसीए") आणि भारतीय प्रतिभूति आणि विनिमय मंडळ ("सेबी") यांनी सदर या संदर्भात जारी केलेल्या सर्व लागू परिपत्रकांसह, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन 2015 च्या सर्व लागू तरतुदींचे पालन करून, एजीएमच्या सूचनेत नमूद केल्यानुसार कामकाज पार पाडण्यासाठी, **मंगळवार, दि. 29 सप्टेंबर 2026 रोजी दुपारी 12.00 वाजता** (भाप्रवे) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ("व्हीसी")/इतर दृकश्राव्य माध्यमांद्वारे ("ओएव्हीएम") आयोजित केली जाईल. वरील निर्देशित एमसीए परिपत्रके आणि सेबी परिपत्रकांनुसार, 21 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि वित्तीय वर्ष 2025-26 चा वार्षिक अहवाल, **गुरुवार, दि. 3 सप्टेंबर, 2026 रोजी,** सर्व सदस्यांना त्यांच्या कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंट/आरटीए (बिगशेअर सर्व्हिसेस प्रा. लिमिटेड) यांच्याकडे नोंदणीकृत असलेल्या ईमेल आयडीवर पाठवण्यात आला आहे. 21 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि वार्षिक अहवाल 2025-26 हे कंपनीच्या **www.steelfiberindia.in** या वेबसाईटवर, स्टॉक एक्सचेंजच्या, म्हणजेच बीएसई लिमिटेडच्या, **www.bseindia.com** या वेबसाईटवर आणि बिगशेअर सर्व्हिसेस प्रा. लि. च्या **ivote.bigshareonline.com** या वेबसाईटवर देखील उपलब्ध आहेत. तथापि, सदस्यांना सूचना आणि वार्षिक अहवालाची छापील प्रत हवी असल्यास, ते **info@steelfiberindia.in** वर विनंती पाठवून कंपनीकडे त्याची मागणी करू शकतात.

कंपनी आपल्या सदस्यांना 21 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर होणाऱ्या ठरावांवर दूरस्थ ई-मतदान आणि एजीएम दरम्यान ई-मतदानाद्वारे मतदान करण्याचा हक्क बजावण्याची सुविधा प्रदान करत आहे. कंपनीने आपल्या सदस्यांना दूरस्थ ई-मतदान आणि एजीएम दरम्यान ई-मतदानाची सुविधा देण्यासाठी बिगशेअर सर्व्हिसेस प्रा. लि. यांची सेवा घेतली असून, सविस्तर कार्यपद्धती एजीएमच्या सूचनेत देण्यात आली आहे.

सर्व सभासदांना कळविण्यात येते की:
1. 21 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद केल्यानुसार कामकाज, इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे मतदानाच्या माध्यमातून पार पाडले जाईल.
2. ईमेल आयडीद्वारे 21 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना पाठवण्याची अंतिम तारीखः गुरुवार, दि. 3 सप्टेंबर, 2026.

दूरस्थ ई-मतदान कालावधी शनिवार, **दि. 26 सप्टेंबर 2026** रोजी भारतीय प्रमाणवेळेनुसार **सकाळी 9.00 वाजता सुरू होईल आणि सोमवार, दि. 28 सप्टेंबर 2026 रोजी भारतीय प्रमाणवेळेनुसार सायंकाळी 5.00 वाजता संपेल. त्यानंतर बिगशेअर सर्व्हिसेस प्रा. लि. द्वारे दूरस्थ ई-मतदान मोड्यूल मतदानासाठी अक्षम केले जाईल. एकदा सदस्यांनी ठरावावर मत दिल्यानंतर, त्यांना नंतर त्यात बदल करण्याची परवानगी दिली जाणार नाही.**

सदस्यांचे मतदानाचा हक्क, अंतिम तारखेनुसार, म्हणजेच **बुधवार, दि. 23 सप्टेंबर, 2026 रोजी,** कंपनीच्या भरणा झालेल्या भाग भांडवलातील त्यांच्या हिश्श्याच्या प्रमाणात असेल. अंतिम तारखेनुसार ज्या सदस्याचे नाव सदस्य/लाभार्थी मालकांच्या नोंदवहीमध्ये नोंदवलेले आहे, तोच सदस्य 21 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत दूरस्थ ई-मतदान/ई-मतदानाच्या सुविधेचा लाभ घेण्यास पात्र असेल, आणि जी व्यक्ती अंतिम तारखेनुसार सदस्य नाही, तिने वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना केवळ माहितीच्या उद्देशाने समजावी.

ज्या सदस्यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी दूरस्थ ई-मतदानाद्वारे आपले मत आधीच नोंदवले आहे, ते वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहू शकतात, परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा हक्क असणार नाही. सूचना पाठवल्यानंतर शेअर्स मिळवून कंपनीचे सदस्य बनणारी आणि कट-ऑफ तारखेपर्यंत शेअर्स धारण करणारी कोणतीही व्यक्ती, डिमॅट खाते क्रमांक/फोलिओ क्रमांक, पॅन, नाव आणि नोंदणीकृत पत्ता नमूद करून **ivote@bigshareonline.com** किंवा **info@steelfiberindia.in** वर ईमेलद्वारे विनंती पाठवून लॉगिन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते.

ई-मेल पत्ता आणि बँक तपशील अद्ययावत करणे:
कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने जारी केलेल्या **दिनांकित 28 डिसेंबर 2022** च्या सर्वसाधारण परिपत्रक क्र. 11/2022, दिनांकित 05 मे 2022 च्या सर्वसाधारण परिपत्रक क्र. 2/2022, दिनांकित 13 जानेवारी 2021 च्या सर्वसाधारण परिपत्रक क्र. 02/2021 आणि दिनांकित 05 मे 2020 च्या सर्वसाधारण परिपत्रक क्र. 20/2020 याअनुषंगाने, कंपनीने 21 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि इतर पत्रव्यवहार/लाभ केवळ त्या भागधारकांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवले आहेत, ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनी/डिपॉझिटरीजकडे नोंदणीकृत आहेत. डिमॅट स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी आपला ई-मेल पत्ता केवळ त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडेच नोंदवावा किंवा ते यासाठी **info@steelfiberindia.in** यावर ई-मेल पाठवून **ivote@bigshareonline.com** ला सीसी देखील करू शकतात.

वार्षिक सर्वसाधारण सभेत सामील होण्याच्या सूचना सूचनेत दिलेल्या आहेत. ई-व्होटिंगबद्दल काही प्रश्न असल्यास, तुम्ही **https://ivote.bigshareonline.com** च्या डाऊनलोड विभागात उपलब्ध असलेले भागधारकांसाठीचे एफएक्यु आणि भागधारकांसाठीचे ई-व्होटिंग वापरकर्ता मॅन्युअल पाहू शकता किंवा बिगशेअर सर्व्हिसेस प्रा. लि. सोबत **ivote@bigshareonline.com** यावर संपर्क साधू शकता किंवा 022-62638338 या क्रमांकावर कॉल करू शकता. अधिक स्पष्टीकरणासाठी सदस्य कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातील कंपनी सचिवांशी संपर्क साधू शकतात किंवा **info@steelfiberindia.in** यावर ई-मेल लिहू शकतात.

कस्तुरी मेटल कम्पोझिट लिमिटेड यांच्यासाठी

दिनांक: 3 सप्टेंबर, 2026
ठिकाण: ए-30/3/1, एमआयडीसी अमरावती,
पिन: 444605

सही/-
समित सुरेंद्र सिंघाई
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डीआयएनः 00907782
ईमेल: info@steelfiberindia.in मोब.: +91 7506509604

पंजाब नैशनल बैंक punjab national bank ...the name you can BANK upon !

आस्ति वसूली प्रबंधन शाखा पीएनबी हाउस, किंग्स्वे, नागपूर - 440001
ईमेल : cs6795@pnb.bank.in

अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) मधील तरतूदींसह वाचण्यात येणा-या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना. याद्वारे कर्जदार व जामीनदार तसेच सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण / भारग्रस्त असलेल्या खाली नमूद अचल मालमत्तेचा बँक / सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिका-यांनी **रचनात्मक / प्रत्यक्ष / सांकेतिक ताबा** घेतलेला असून संबंधित कर्जदार व जामीनदारांकडून बँक / सुरक्षित धनकोस घेणक असलेल्या थकबाकी रकमेच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या दिनांकास त्यांची ''जशी आहे जेथे आहे, जशी आहे जे काही आहे आणि ''जे काही आहे तेथेच आहे'' तत्वावर विक्री करण्यात येईल. आरक्षित किंमत आणि बयाणा रक्कम खाली त्या-त्या मालमत्तांच्या समोर नमूद करण्यात आलेली आहे.

सुरक्षित मालमत्तेचे वेळापत्रक

अ. क्र.	शाखेचे नाव / खात्याचे नाव / कर्जदार(वैयक्तिक / संयुक्त/फर्म/कं.) चे नाव प्रोप्रायटर /भागीदार/संचालक/ जमानतदार	अचल संपत्तीचा तपशील तारण / मालकाचे नाव (मालमत्ता तारण)	अ) सेक्शन 13(2) सरफेसी ॲक्ट 2002 अन्वये मागणी सूचना तारीख ब) थकीत बाकी रक्कम क) सेक्शन 13(4) सरफेसी ॲक्ट 2002 अन्वये ताबा तारीख (ड) प्रत्यक्ष / सांकेतिक ताब्याचे स्वरूप	अ) राखिव किंमत (रुपये) ब) ईएमडी रक्कम क) (ईएमडी जमा करण्याची अंतिम तारीख) ड) बोली वाढ करण्याची रक्कम	ई-लिलाव तारीख / वेळ	सुरक्षित लेनदारांना ज्ञात बोजांचा तपशील
1.	**खामला, नागपूर** **मेसर्स. केशव खनक सीड्स प्रा लि. (कर्जदार) श्रीमती. सतपाल केशवदास हसानी (डायरेक्टर / गहाणदार आणि मृतक श्री. केशव सौ. रोशनी केशवदास सहजराम हसानी यांचे यांचे कायदेशीर वारस) श्रीमती. केसर सतपाल हसानी (डायरेक्टर / गहाणदार) हसानी मालक / गहाणदार आणि मृतक श्री. केशव सहजराम हसानी यांचे कायदेशीर वारस) सौ. चंदा केशववदास हसानी (मालक / गहाणदार आणि मृतक श्री. केशव सहजराम हसानी यांचे कायदेशीर वारस) श्री. सतपाल केशवदास हसानी (गहाणदार / जमानतदार / मृतक श्री. केशव सहाजराम हसानी यांचे कायदेशीर वारस) श्रीमती. केसर सतपाल हसानी (गहाणदार / जमानतदार)**	सर्व भाग आणि तुकडा बिगर शेती जमीन बेअरिंग प्लॉट नं. 315/3, क्षेत्रफळ 6400 चौ.मी., तसेच 1.58 एकर, ग्राम पंचायत खमारी, थक नं. 93, पी.एच नं. 31, आमगाव बाह्य रिंग रोड, गोंदिया, ता. आणि जि. गोंदिया चतुर्सिमा:- पुर्वः रोड, पश्चिमः मेंढे यांची जमीन, उत्तरः मेंढे यांची जमीन, दक्षिणः खुली जमीन 2. सर्व भाग आणि तुकडा बिगर शेती जमीन बेअरिंग प्लॉट नं. 315/7 (नविन) 135/1 (जुना) ग्राम पंचायत- खमारी, थक नं. 93, पी.एच नं. 31, आमगाव बाह्य रिंग रोड जवळ, गोंदिया, क्षेत्रफळ 3300 चौ.मी ता. आणि जि. गोंदिया चतुर्सिमा:- पुर्वः रोड, पश्चिमः गट नं. 315/4 तुलसिराम गोपलानी यांची जमीन, उत्तरः स्वताची जमीन, दक्षिणः गट नं. 316 आणि 317 **मालक आणि गहाणदार दोन्ही अनु क्र 1 आणि 2 श्री. केशवदास सहाजीराम हसानी आणि श्री. सतपाल केशवदास हसानी**	अ) 04.01.2024 ब) रु. 9,24,56,780.12 +व्याज आणि अन्य शुल्क डब्लु.इ.एफ 01.01.2024 क) 01.04.2024 ड) सांकेतिक ताबा	अ) रु. 5,02,00,000/- ब) रु. 50,20,000/- क) 23.09.2026 ड) 50000.00	24.09.2026 रोजी स.11.00 ते दु.4.00 वाजे पर्यत	१) स्पेशल सिव्हिल सूट क्र. ८३/२०२५ (सिव्हिल कोर्ट, गोंदिया), २) मिस्क. अपील क्र. ३१३/२०२६ (DRAT मुंबई), ३) मिस्क. अपील क्र. २३३/२०२६ (DRAT मुंबई), ४) एसए/१५७/२०२४ (DRT नागपूर), ५) एसए/३१/२०२६ (DRT नागपूर)

अटी व शर्ती :- 1. ही विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम 2002 मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन असेल आणि खालील अतिरिक्त अटींच्या अधीन असेल. लिलाव विक्री ही https://www.baanknet.com या ई-लिलाव पोर्टलवर ऑनलाईन स्वरुपात होईल.
2. इच्छुक बोलीदार /खरेदीदारांना विनंती आहे की त्यांनी त्यांचा ईमेल आयडी आणि मोबाईल नंबर वापरून **(https://baanknet.con.com)** पोर्टलवर नोंदणी करावी. eKYC ची प्रक्रिया डिजी लॉकरद्वारे करावी. एकदा e-KYC पूर्ण झाले की, इच्छुक बोलीदार / खरेदीदार पोर्टलवरील ई-लिलावाच्या तारखेपूर्वी ऑनलाइन/चलन पद्धतीने ईएमडी रक्कम त्यांच्या ई-वॉलेटमध्ये हस्तांतरित करु शकतात. नोंदणी, ई-केवायसीची पडताळणी, वॉलेटमध्ये ईएमडी हस्तांतरित करणे आणि वॉलेटची रक्कम मालमत्तेशी जोडणे हे लिलावापूर्वी खूप आधी पूर्ण केले पाहिजे.
3. वरीलप्रमाणे नमूद केलेली अर्नेस्ट मनी डिपॉझिट (EMD) रक्कम ऑनलाइन/चालान पद्धतीने भरावी लागेल आणि ती बोलीदाराच्या ई-वॉलेटमध्ये जमा केली जाईल. जे बोलीदार आवश्यक EMD ऑनलाइन भरत नाहीत, त्यांना ई-लिलावात सहभागी होण्याची परवानगी दिली जाणार नाही. जमा केलेल्या EMD रकमेवर कोणताही व्याज दिला जाणार नाही.
4. ई-लिलावासाठीचे प्लॅटफॉर्म **(https://baanknet.com)** हे ई-लिलाव सेवा प्रदाता **M/s PSB Alliance Pvt. Ltd.** यांच्यामार्फत पुरवण्यात येईल. यांचे **नोंदणीकृत कार्यालय युनिट 1, तिसरा मजला, VIOS कमर्शियल टॉवर, वडाळा ट्रक टर्मिनलजवळ, वडाळा ईस्ट, मुंबई-400037 येथे आहे. (हेल्पडेस्क क्रमांक: +91 8291220220, ईमेल आयडी: support.BAANKNET@psballiance.com).** इच्छुक बोलीदार/खरेदीदारांनी ई-लिलाव सेवा प्रदात्याच्या संकेतस्थळावर (https://baanknet.com) जाऊन ई-लिलाव प्रक्रियेत सहभागी होणे आवश्यक आहे. हा सेवा प्रदाता ई-लिलावासाठी ऑनलाईन प्रात्यक्षिक/प्रशिक्षण देखील पोर्टलवर उपलब्ध करून देईल.
5. विक्रीच्या अटी व शर्ती असलेली विक्री सूचना पुढील वेबसाईट / वेब पेज पोर्टलवर उपलब्ध आहे। प्रकाशित करण्यात आलेली आहे: **(1) https://baanknet.com, (2) www.pnbindia.in.**
6. ई-लिलावात सहभागी होण्यास इच्छुक ई-लिलाव पोर्टलवरून **(https://baanknet.com)** विक्री सूचनेच्या प्रती, ई-लिलावाच्या अटी व शर्ती, ई-लिलावाशी संबंधित परिचालनात्मक भागावरील हेल्प मॅन्युअल इ. निःशुल्क डाउनलोड करू शकतात.
7. बोलीदाराच्या ई-वॉलेटमध्ये बोलीच्या वेळी पुरेशी जमा रक्कम (>= बयाणा रक्कम) असावी,
8. ई-लिलावादरम्यान बोलीदारांना शेवटच्या बोली रकमेपेक्षा अधिक रकमेसाठी आपसांत बोली करण्याची परवानगी असेल आणि बोली रकमेमधील वाढ ही येथे नमूद वृद्धी मूल्य ही असावी. बोलीदारांना पुढील सर्वोच्च बोलीसाठी दहा मिनिटांचा कालावधी देण्यात येईल आणि 10 मिनिटे लोटल्यानंतर मागील सर्वोच्च बोलीपेक्षा अधिक रकमेची बोली कुणाही बोलीदाराने देऊ न केल्यास ई-लिलाव बंद करण्यात येईल.
9. विक्रीची नोटीस, ई-लिलावाच्या अटी व शर्ती, तसेच ई-लिलावाच्या कार्यपद्धतीवरील मदत पुस्तिका नीट वाचणे आणि त्यांचे काटेकोरपणे पालन करणे ही इच्छुक बोलीदारांची जबाबदारी आहे.
10. ई-लिलाव प्रक्रियेच्या आधी किंवा दरम्यान कोणतीही अडचण आल्यास किंवा सहाय्याची गरज भासल्यास, बोलीदारांनी आमच्या ई-लिलाव सेवा प्रदाता **M/s PSB Alliance Pvt. Ltd.** च्या अधिकृत प्रतिनिधींशी संपर्क साधावा, ज्यांचा तपशील baanknet पोर्टलवर उपलब्ध आहे.
11. अधिकृत अधिकारी यांनी ई-लिलाव अंतिम केल्यानंतर, केवळ यशस्वी बोलीदारांना आमच्या वरील उल्लेखित सेवा प्रदात्याकडून SMS/ईमेलद्वारे कळवण्यात येईल. (मोबाईल नंबर/ईमेल पत्ता जो त्यांनी सेवा प्रदात्याशी नोंदणीकृत केला आहे).
12. सुरक्षित मालमत्ता ही राखीव किंमतीखाली विकली जाणार नाही.
13. यशस्वी बोलीदाराला बोली रकमेच्या २५% (पंचवीस टक्के) रक्कम, जमा केलेली ईएमडी रक्कम वजा करून, त्याच दिवशी किंवा पुढील कामकाजाच्या दिवसापर्यंत जमा करावी लागेल आणि उर्वरित रक्कम लिलावाच्या तारखेपासून **१५ दिवसांच्या आत** ""अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक, खाते (खात्याचे नाव) यांच्या नावे काढलेल्या शेड्युल्ड कमर्शियल बँकेने जारी केलेल्या बँकर्स चेक/डिमांड ड्राफ्टच्या स्वरूपात भरावी लागेल. निर्धारित वेळेत वरीलप्रमाणे रक्कम जमा करण्यात अयशस्वी झाल्यास, यशस्वी बोलीदाराने जमा केलेली रक्कम बँकेकडे जप्त केली जाईल आणि अधिकृत अधिकाऱ्याला मालमत्तेचा नवीन लिलाव/विक्री करण्याचे स्वातंत्र्य असेल आणि कसूर करणाऱ्या बोलीदाराचा जप्त केलेल्या रकमेवर आणि मालमत्तेवर कोणताही दावा करता येणार नाही.
14. यशस्वी बोलीदाराने बँकेस देऊ केलेली विक्री रक्कम प्राप्ती कर अधिनियम, 1961 मधील अनुच्छेद 194-1ए अंतर्गत टीडीएस च्या अधीन असेल आणि यशस्वी बोलीदारास टीडीएस चा भरणा बोली रकमेच्या उर्वरित 75% रकमेचा / संपूर्ण बोली रक्कम जमा करतेवेळी करावा लागेल.
15. स्वीकार्य वाटत नसल्यास कोणतीही किंवा कोणतेही कारण न देता सर्व बोली स्वीकारण्याचा किंवा कोणत्याही वेळी लिलाव पुढे ढकलण्याचा / रद्द करण्याचा / बरखास्त करण्याचा / खंडित करण्याचा किंवा लिलावाच्या अटींमध्ये बदल करण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारी राखून ठेवतात आणि या संदर्भात त्यांचा निर्णय अंतिम असेल.
16. सदर अधिनियमातील तरतुदीनुसार संपूर्ण बोली रक्कम जमा केल्यानंतर यशस्वी बोलीदाराच्या नावे विक्री प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.
17. सदर मालमत्तांची विक्री **"जसे आहे जेथे आहे", आणि "जसे आहे जे आहे" आणि "तेथे जे काही आहे"** या तत्वावर करण्यात येईल
18. वर नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या अनामत मत्तेचा तपशील प्राधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम माहितीनुसार आहे, तरी त्यात कोणतीही चूक, चुकीचे विधान झाल्यास किंवा काही गाळले गेले असल्यास त्यासाठी प्राधिकृत अधिकारी उत्तरदायी असणार नाही.
19. बोली सादर करण्यापूर्वी मत्ता व तिच्या विनिर्देशांची पाहणी करून स्वतःचे समाधान कडून घेण्याची संपूर्ण जबाबदारी बोलीदाराची असेल. खाली दिलेल्या माहितीनुसार संबंधित अधिकाऱ्याशी संपर्क साधून बोलीदारास मालमत्तेची पाहणी करता येईल.
20. सर्व वैधानिक थकबाकी / आनुषंगिक शुल्के उदा. नोंदणी शुल्के, मुद्रांक शुल्क, कर इत्या. चा खर्च खरेदीदारास करावा लागेल.
21. बँकेस ज्ञात नसलेल्या सदर मालमत्तेच्या (ई-लिलावात काढलेल्या) संदर्भातील कोणतेही शुल्क, धारणाधिकार, बोजे किंवा इतर कोणतीही थकबाकी मग ती सरकार किंवा इतर कोणासही देणे असो त्याची जबाबदारी प्राधिकृत अधिकारी किंवा बँकेची नसेल. सदर मालमत्तेवरील बोज्यासह, वैधानिक दायित्व, मालमत्ता कराची थकबाकी, वीज बिलाची थकबाकी इत्या. च्या बाबतीत इच्छुक बोलीदारांनी स्वतंत्र चौकशी करावी.
22. बोलीदाराने सुयोग्य इंटरनेट जोडणी, पावर बँक अप. इत्या. ची व्यवस्था करावी. इंटरनेट बंद पडल्यास, वीज खंडित झाल्यास किंवा ई-लिलावावर प्रभाव टाकणाऱ्या तांत्रिक कारणांमुळे किंवा इतर कोणत्याही आकस्मिक कारणांसाठी बँक जबाबदार राहणार नाही.
23. सदर लिलावात सहभागी होण्यासाठी एखाद्या प्रतिनिधीची नियुक्ती करून स्वतः बोली लावण्याचा व लिलावात सहभागी होण्याचा मार्ग बँकेस खुला आहे. विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया https://baanknet.com/ आणि www.pnbindia.in येथे भेट द्यावी.
24. प्लांट आणि मशिनरीची राखीव किंमत लागू असलेल्या GST वगळून आहे.
25. संपर्क व्यक्ती **1. कपिल घरडे (व्यवस्थापक) 7757005195, 2. आशिष राजूरकर (उपव्यवस्थापक)- 9960950750, 3. श्री संदीप अखरे (सिनीयर मॅनेजर) 9657394162, 4. श्री संजय कुमार शर्मा (चीफ मॅनेजर एआरएमबी) - 9012683623.**

स्थळ : नागपूर दिनांक : 04/09/2026 इंग्रजीतील मूळ मजकूर ग्राह्य धरण्यात येईल. **अधिकृत अधिकारी पंजाब नॅशनल बँक**